# लोकमंगल विज्ञान महाविद्यालयाची राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राला भेट

वडाळा येथील लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालयाच्या जैवतंत्रज्ञान विभागाची शैक्षणिक सहल दिनांक 1 जून 2023 रोजी केगाव येथील राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. यावेळी महाविद्यालयातील दोन प्राध्यापक व 35 विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवला .

यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्रातीलविविध संशोधने, टिशू कल्चर लॅब, मॉलिक्युलर बायोलॉजी लॅब, राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्राची स्थापना, उद्दिष्टे, त्यांनी संशोधन केलेली उत्पादने , प्रोसेसिंग युनिट आदी गोष्टींची सखोल माहिती विद्यार्थ्यांना मिळाली.

यावेळी राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ पोकरे सर, डॉ. अनमोल उकाळे सर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या शैक्षणिक सहलीसाठी मार्गदर्शक प्राचार्य डॉ. सतीश कुमार देवकर सर, विभागाचे प्रमुख डॉ किरण जगताप ,प्रा. अंकुश गोरत्याल आमचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या सहलीसाठी प्रा विनय सामलेटी व प्रा सुजाता देवकर यांनी परिश्रम घेतले.






Tissue Culture
Laboratory
Stages of in vitro propagation in pomegranate
National Research Centre on Pomegranate


अनार प्रसंस्करण इकाई
POMEGRANATE
PROCESSING UNIT


राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्र